# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, गडचिरोली
दिनांक ०५.१२.२०१८

## जनमैत्री मेळाव्यात नागरीकांना विविध शेती उपयोगी साहित्याचे वाटप

दिनांक ०१/१२/२०१८ ते दि. ०४/१२/२०१८ रोजी पर्यंत उपविभाग पेंढरी कॅम्प कारवाफा अंतर्गत मौजा कारवाफा येथे जिल्हा पोलीस विभागाच्या वतीने जनमैत्री मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यात उपविभागीय पोलीस अधिकारी पेंढरी श्री बसवराज शिवपुजे यांनी नागरीकांना मार्गदर्शन करुन शासनाच्या योजनांबद्दल माहीती दिली.

कार्यक्रमाचे उद्घाटन श्री बसवराज शिवपुजे यांचे हस्ते करण्यात आले यावेळी सरपंच सौ. प्रेमिलाताई कुमरे, पोलीस पाटील सौ. रायपुरे मॅडम, पोलीस पाटील सौ. गेडाम मॅडम व उपविभागीय पोलीस अधिकारी पेंढरी कॅम्प कारवाफा श्री बसवराज शिवपुजे साो. हे उपस्थित होते. मेळाव्या दरम्यान पिहील्या दिवशी प्रथमिक आरोग्य केंद्र कारवाफा यांचे वतीने नागरीकांची आरोग्य तपासणी करुन मोफत औषधींचे वाटप करण्यात आले. तसेच संगीत खुर्ची स्पर्धा घेण्यात आली. आरोग्य विषयक प्रोजेक्टर वर विविध कार्यक्रम दाखविण्यात आले. दुस-यादिवशी सकाळी योगा, क्रिडा स्पर्धा सांस्कृतीक कार्यक्रम, व रवि पेद्दीवार यांनी व्यसनमुक्ती सबंधी जनजागृती कार्यक्रम दाखविण्यात आले. तसेच पेसा कायदा विषयावर डॉ. चौधरी यांनी मार्गदर्शन केले. रात्री आदिवासी संस्कृतीवर आधारीत चित्रपट दाखविण्यात आले.दिनांक ०३/१२/२०१८ रोजी सकाळी ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच शांतता रॅली काढण्यात आली. दुपारी अंधश्रध्दा निर्मुलन बाबत डांगे सर यांनी नागरीकांना मार्गदर्शन केले. दिनांक ०४/१२/२०१८ ला सकाळी मेळाव्यास उपस्थित असलेल्या नागरीकांना शेती उपयोगी फावडे, टिकास, घमेले इत्यादी सारखे विविध कृषी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास उपस्थित पेंढरी उपविभागातील गाव पाटील तसेच विविध विभागाचे अधिकारी आदि मान्यवर होते. कार्यक्रमाचा शेवटी प्रतिज्ञा कार्यक्रम करण्यात आला. सदर जनमैत्री मेळाव्यास उपविभागातील सुमारे २०० नागरीक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन सतिश बांगर यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी जिल्हा पोलीस पोमके कारवाफा तसेच क्युआरटी पेंढरी चे सर्व कर्मचा-यांनी परीश्रम घेमले.


गडचिरोली पोलीस आयोजित
निवासी प्रशिक्षण शिबीर
उपविभाग, पेंढरी